# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०५/२०१९
## दि.०३/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १९९/१९,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | श्रीनिवास खांदवे,वय ६१ वर्षे,रा.लोहगाव,ता.हवेली,जि.पुणे. |
| **आरोपी** | १)अमिरुल हसन खान, रा.अकरबर शेख यांची चाळ,खोली नं.९, खांदवेनगर,लोहगाव,पुणे २)मोहमंद मुस्तकीम दिन बहाद्दूर चौधरी,वय- २२ वर्षे, रा.अकबर शेख यांचे जागेत असलेल्या भंगाराचे दुकानामध्ये, खांदवेनगर, लोहगाव पुणे. (अ.क्र.२ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक-०२/०५/२०१९ रोजी रात्रौ २३/३० वा.चे सुमारास अकबर शेख यांचे शेत जमिनीमध्ये त्यांचे घराचे मागे असलेल्या भंगार दुकानाचे जवळ, स.नं.१२४/२, खांदवेनगर, लोहगाव, पुणे येथे मोकळया जागेत |
| **तपशिल** | वर नमूद केले तारखेस वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांचा मुलगा- गौरव श्रीनिवास खांदवे हा फेरफटका मारण्यासाठी गेला असताना, फिर्यादी यांचे शेताचे शेजारी असलेल्या अकबर शेख यांचे घराचे मागे असलेल्या भंगार दुकानाचे जवळ असलेल्या मोकळया जागेत भंगार दुकानातील इसम-अमिरुल हसन खान, व इसम -मोहमंद मुस्तकीम दिन बहाद्दूर चौधर हे वायर जाळत असल्याने व सदर ठिकाणी वायर जाळल्याने धुर होऊन त्याचा त्रास होत असल्याने सदरबाबत आग विझविण्यासाठी फिर्यादी यांचे मुलाने इसम अमिरुल हसन खान व मोहमंद मुस्तकीम चौधरी यांना सांगितले असता,त्यांना त्याचा राग येऊन त्यांनी फिर्यादी यांचा मुलगा-गौरव यास लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन, इसम अमिरुल हसन खान याने लोखंडी रॉड उचलून फिर्यादी यांचे मुलाचे तोंडावर लोखंडी रॉडने मारहाण करुन,त्याला गंभीर जखमी करुन,त्याला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.आर. खोकले ९८५०९०९५५५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १८४/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | सुरेश ईरमाणी, वय ४९ वर्षे,रा.भुसारी कॉलनी, पौंड रोड, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०१९ रोजी सायं.०६/०० वा.ते दि.०२/०५/२०१९ रोजी सकाळी ०९/३० वा.पर्यंत आयटीएस पॉवर ॲण्ड इफ्राट्रक्चर प्रा.लि.कंपनी सर्व्हे नं.७७ दांगट इंडस्ट्रियल इस्टेट शिवणे पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची वर नमुद कंपनी कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे कंपनीमधील खिडकी कशाचे तरी सहारय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, कंपनीमध्ये ठेवलेले हीट सिकं प्लेट, कॉपर व ॲल्युमिनीअम केबल, इलेक्ट्रॉनिक्स पॉवर डिव्हीयसेस असा एकुण १ लाख ९५ हजार रु.किं.चा माल फिर्यादीचे संमतीशिवाय घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. क्षीरसागर ९८३०८८८८३९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १८३/१९,भादविक ३२४,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | विशाल देशमुख, वय २१ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | सहा ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०५/२०१९ रोजी रात्रौ ११/०० वा.चे सुमारास शिवकॉलनी, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन, त्यापैकी फिर्यादी यांचे ओळखीच्या एका इसमाने फिर्यादी यांचे गालावर चापट मारुन, त्यावेळी फिर्यादी यांने त्याला बाजुला सारले असता, त्याचे बरोबर आलेल्या इतर इसामांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, दगडाने मारहाण करुन, फिर्यादी यांचे डोक्याला व |

| | |
|---|---|
| | बरगडीला दगड लागुन , त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कदम ९४०३४४१५९७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३२५/१९,भादविक ३२६,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८, १४९ |
| **फिर्यादी** | रोहित निकम,वय २९ वर्षे,रा.खडकी, पुणे |
| **आरोपी** | १.लतेश वसंत शिंदे,वय ४९ वर्ष २.सुरज समाधान शिंदे,वय २४ वर्ष ३.स्वप्निल राजु शिंदे वय २६ वर्ष, ४.सुहास विठ्ठल शिंदे, वय ३४ वर्ष ५.विक्की सुभान शिंदे, वय ३६ वर्ष, ६.महेश सदा शिंदे, वय ३९ वर्ष, सर्व रा.६३ संगमवाडी, येरवडा, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/०५/२०१९ रोजी दुपारी ०१/३० वाजता ते ०२/०० वाजताचे दरम्यान नवनाथ मित्र मंडळ संगमवाडी पुणे |
| **तपशिल** | दिनांक ०१/०५/२०१९ रोजी रात्रौ दिनेश शिंदे व त्यांचे सहकारी यांची विक्की रत्तु यांचेशी झालेली भांडणे यातील फिर्यादी व इतर ग्रामस्थांनी सोडविल्याचे कारणावरून व त्याचा राग मनात धरून, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, अक्षय तापकीर व श्रीहरी निकम यांना यातील नमुद इसमांनी आपसांत संगनमत करून गैरकायदयाची मंडळी जमवून शिवीगाळ करून, जिवे मारण्याची धमकी देवून, लाकडी बॅटन, कमरपट्टयाने, दगडाने व हातापायाने मारहाण करून, जखमी केले असून ती भांडणे फिर्यादी हे सोडविणेस गेले असता त्यांना सुध्दा हातापायाने मारहाण करून, सुरज शिंदे याने लोखंडी रॉड फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. साबळे ८६९८३२१७१७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३४१/१९,भादविक २७९,३३७,३०४(अ),मोव्हेॲक, ११९/१७७,१३४ |
| **फिर्यादी** | सौ.सविता जाधव,वय ४५ वर्ष,रा.खेड शिवापुर, ता.भोर,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०१९ रोजी दुपारी १४/३० वा.चे सुमारास कात्रज जुन्या बोगद्यात मध्यभागी कात्रजकडून, साता-याचे दिशेने जाणा-या रस्त्यावर, कात्रज, पुणे. |
| **तपशिल** | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मानलेला भाऊ हिरामण शिर्के यांचे सोबत फिर्यादी यांचा मुलगा किसन जाधव,वय ७ वर्षे, असे दोघे डाव्या बाजुने चालत जात असताना, फिर्यादी यांचा मानलेला भाऊ हिरामण सुदाम शिर्के,वय ४५ वर्षे,रा.खेड शिवापुर, मुळ रा.काळीज, पो.बिरवाडी,ता.महाड,जि.रायगड यास कात्रजकडून साता-याकडे जाणा-या अज्ञात वाहनाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, अविचाराने, बेदरकारपणे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, पाठीमागुन धडक मारून, जखमी करून त्याचे मृत्युस कारणीभुत झाला तसेच फिर्यादी यांचा मुलगा किसन यास जखमी करण्यास कारणीभुत झाला. तसेच अपघाताची खबर कोणास न देता परस्पर तेथुन निघुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस. आर. चिवडशेट्टी ८१०८२२२०६८ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १८३/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय ६० वर्षे,रा.आंबेडकर रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०१९ रोजी दुपारी ०४/४५ वा.ते दि.०२/०५/२०१९ रोजी पर्यंत एस.बी.आय.बँके ट्रेझरी शाखा,जिल्हाधीकारी कार्यालयाचे बाजुला,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे एस.बी.आय.बँकेचे ट्रेझरी शाखा जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाजुला, पुणे येथील एटीएम मधुन पैसे काढत असताना, फिर्यादी यांचे मागे रांगेत उभे असलेल्या इसमाने मी पैसे काढुन देतो असे सांगुन हातचालाखीने फिर्यादी यांचे एटीएम कार्ड बदलुन व एटीएम कार्डचे पिन कोड माहिती करुन, सदर कार्डचा वापर करून, त्यांचे खात्यातुन एकुण १ लाख ८३ हजार १२०/- रूपये काढून फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. स्वामी ९५५२५२२५४३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १५१/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | महेश कदम, वय ३० वर्षे,रा.मुंबई |
| **आरोपी** | मधुकर दादू साळवे, रा.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०३/२०१९ रोजी सकाळी ०९/२१ वा.चे सुमारास भंडारकर इन्स्टीटयुट भांडरकर रोड, डेक्कन,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद इसमाने फिर्यादी व त्यांचे इतर तीन नातेवाईकांना मुंबई येथील भवन कॉलेज येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवुन प्रत्येकी ६० हजार रु.प्रमाणे एकुण २ लाख ४० हजार रु. बँकेत भरण्यास लावुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.बी.मेटे ९५५७७१२१५३ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १७१/१९,भादविक ४१७,४२० |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ३६ वर्षे,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१२ ते दि.०३/०५/२०१९ रोजी पर्यंत धानोरी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले कालावधी व ठिकाणी, यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचेशी लग्नाचे आमिष दाखवुन, आपण लग्न करणार आहोत असे सांगुन वेळोवेळी त्याच्या वैयक्तीक व त्याचे घरगुती कारणासाठी त्यांचेकडुन २ लाख ९ हजार ३००/- रु. रक्कम घेवुन, त्याचा त्याने स्वतः वापर करुन, फिर्यादीने वेळोवेळी त्याला लग्न करण्यास विचारणा केली असता त्याने वेगवेगळे कारणे देवुन त्यांच्याशी लग्न न करता व फिर्यादीची घेतलेली रक्कम परत न देता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.पी.यादव ९४२२६४४५७७ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ३५९/१९,भादविक ३५३, महा.पो.का.क. ३३(क्ष)(आर)(डब्ल्यु)/१३१ |
| **फिर्यादी** | एम.एस.राऊत, वय ३० वर्षे, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगर पालिका, पुणे |
| **आरोपी** | दुर्गा बाबु महतो,वय ३२ वर्षे,रा.डी विंग,नवदीप सोसायटी, न-हे,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१९ रोजी सायं.१९/२० वा.चे सुमारास गोयल गंगा चौकातील गंगा भाग्योदय सोसायटी जवळ, फुटपाथवर सिंहगड रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया अतिक्रमण कारवाई करित असताना,यातील नमुद इसम हा अनाधिकृतपणे चायनीझ स्टॉल चालवुन त्यावर कमर्शिअल वापराचा गॅस सिलेंडर हा अन्न शिजविण्यासाठी वापरताना आढळुन आल्याने सदर बाबत त्याच्याकडे सदर स्टॉलचे परवान्याबाबत विचारपुस करता त्याच्याकडे सदर गॅस सिलेंडर बाबत कोणताही वैध परवाना नसल्याने फिर्यादी यांनी त्यांचे सोबत असलेल्या पुणे मनपा कडील स्टाफला सदर गॅस सिलेंडर हा ताब्यात घेवुन त्यावर कारवाई करण्यास सांगितल्याने सदर इसमाने “तुम्ही कारवाई का करताय, मी तुम्हाला कारवाई करु देणार नाही” असे म्हणुन आरडा-ओरडा करुन फिर्यादीचे अंगावर धावुन येवुन, फिर्यादी यांच्या सोबतचा स्टाफ सदर सिलेंडर कारवाई करणेसाठी ताब्यात घेत असताना त्याने तो सिलेंडर जबरदस्तीने हिसकावुन घेवुन फिर्यादी हे लोकसेवक म्हणुन कर्तव्य पार पाडत असताना सरकारी कारवाईत अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.डी.सांळुखे ७०२०६८४७१० |

## दि.०४/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३९४/१९,भादविक ३०७,३२४,५०६,३४, महा.पो.अधि.क.३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | निलेश कटके, वय ३६ वर्षे,रा.सुखसागरनगर, कात्रज,पुणे, |
| **आरोपी** | १)अली ईस्माइल चित्तापुरे, वय २१ वर्षे,रा.सर्व्हे नं.१३ सम्राट टॉवर जवळ, सुखसागर नगर, कात्रज,पुणे २)प्रशांत मोहन शिवनळु, वय २३ वर्षे,रा.राजीव गांधी नगर,अप्पर इंदिरानगर, पुणे ३)स्वप्निल धोंडीराम शेडगे, वय २२ वर्षे,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१९ रोजी १९/३० वा.चे सुमारास साळवे गार्डन शेजारी सभंव फुडस पोर्ट मधील चंदुकाका डोसा कॉर्नर स्टॉलवर कोंढवा बु//,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे यातील नमुद इसम अली चित्तापुरे यांचे चुलत्याचे घरात भाड्याने रहाण्यास असुन, दि.२९/०४/२०१९ रात्री ते बाथरुमसाठी घरा बाहेर आले असता यातील नमुद इसम अली चित्तापुरे यांची आई हिने त्यांना नेहमीच बाहेर घाण करतो, असे म्हणाली असता तक्रारदार हे त्यांना उलटे बोलले असता तीने आरडा ओरडा करुन, तिचे मुलास फिर्यादी यांनी हात धरल्याचे सांगितले असता त्यावेळी नमुद इसमाने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, हाताने मारहाण करुन, घर खाली करण्यास सांगितले त्यामुळे फिर्यादी घर खाली करुन दुसरीकडे राहण्यास गेले होते. वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी व त्यांचा भाऊ रवि कटके असे त्यांचे चंदुकाका डोसा कॉर्नर येथे व्यवसाय करीत असताना, यातील नमुद इसमांनी कोयते दगडी घेवुन, फिर्यादी यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे डोक्यात कोयता मारत असताना फिर्यादी यांने हात मध्ये घेतल्याने त्यांचे हातावर गळयाजवळ, छातीवर वार करुन, दगडाने मारहाण करुन, फिर्यादी यांना गंभीर जखमी करुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावेळी फिर्यादी यांचा भाऊ रवि कटके मध्ये आला असता, यातील नमुद इसमांनी त्याचेवर कोयत्याने वार करुन, त्याला दगड फेकुन मारुन, जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पंकज पवार ८८०५९८९४७२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**